कमला कॉलेज

# व्यवसायाभिमुख शिक्षण गरजेचे

## डॉ. कुरूप : 'अन्नप्रक्रिया उद्योगातील संधी व आव्हाने' या विषयावर चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तरुणांना सध्या व्यवसायाभिमुख शिक्षण देणे गरजेचे आहे. व्यवसायाभिमुख शिक्षण ही उद्योग जगताचीही सध्याची गरज आहे. कुशल मनुष्यबळाला या विभागातून मोठ्या प्रमाणात मागणी आहे, असे प्रतिपादन मुंबईच्या केळकर-वझे कॉलेजचे प्राध्यापक डॉ. एम. आर. कुरूप यांनी केले.

कमला कॉलेज व कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ यांच्या वतीने 'भारतातील अन्नप्रक्रिया, उद्योगातील संधी व आव्हाने' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. यावेळी बोलत होते.

अध्यक्षस्थानी डॉ. एस. एन. पवार होते. यावेळी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, 'गोकुळ'चे कार्यकारी संचालक व्ही. डी. घाणेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : चर्चासत्रात बोलताना डॉ. एम. आर. कुरूप.**

डॉ. कुरूप म्हणाले, 'शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला नोकरीची संधी असते. त्याद्वारे तो दारिद्र्यातून बाहेर पडू शकतो. राज्याकडून शिक्षणात केलेली गुंतवणूक राज्याला दारिद्र्यातून बाहेर काढू शकते. शिक्षण हा दारिद्र्य निर्मूलनाचा मूलभूत उपाय आहे. आयटीआय, अभियांत्रिकी पदविका यांचे अभ्यासक्रम अद्ययावत करणे गरजेचे आहे. भारतात सेवा, संगणक, योगा, रिटेलिंग, अन्नप्रक्रिया हे अभ्यासक्रम समाजाची गरज आहेत.

कृषी महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. डी. डी. पतंगे यांनी भारतातील अन्नप्रक्रिया उद्योगात १३ ते १५ टक्के वृद्धी होत आहे. अनेकदा देशात शेतकऱ्याजवळ उत्पादन घेण्यासाठी पिकाची गरज किती आहे? त्याचे देशात उत्पादन किती होते, याविषयी माहिती असत नाही. यामुळे त्याचे आर्थिक गणित फसते. ती माहिती शेतकऱ्याला होणे गरजेचे आहे. २०११ नंतर अन्नप्रक्रियेत अन्नपदार्थांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येत आहे.

भारतात जमिनीची विविधता आहे. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारची पिके येतात. सध्याच्या केंद्र शासनाने 'मेक इन इंडिया' या कार्यक्रमांतर्गत अन्नप्रक्रिया उद्योगालाही चालना देण्यात येणार आहे. अन्नप्रक्रिया उद्योगाला चांगली संधी आहे. मात्र, काही टक्केच अन्नपदार्थावर प्रक्रिया होते. यासाठी बाजारपेठेच्या मागणीनुसार अन्नपदार्थांची निर्मिती, नवीन अन्नपदार्थांची निर्मिती व प्रक्रियेसाठीचे आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे.

स्वागत डॉ. रिता धुमाळ यांनी, प्रास्ताविक प्रा. रेखा पंडित यांनी केले. डॉ. अनघा पाठक यांनी आभार मानले.

Scanned by CamScanner